आपत्ती व्यवस्थापन प्रभागासाठी निविदा समिती / खरेदी समितीची स्थापना करणेबाबत..

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन)
शासन निर्णय क्रमांक :- आव्यप्र-२०१७/प्र.क्र.३४१ / आव्यप्र-१,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- २१ एप्रिल, २०१८.

वाचा :-उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक- भांखस-२०१४/प्र.क्र.८२ भाग ।।। / उद्योग -४, दिनांक १.१२.२०१६

शासन निर्णय :-

उपरोक्त वाचा येथील शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक २.९.३ ला अनुसरुन महसूल व वन विभाग, मदत व पुनर्वसन उप विभागांतर्गत कार्यरत आपत्ती व्यवस्थापन प्रभागसाठी खालीलप्रमाणे निविदा समिती / खरेदी समिती गठित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

१	संचालक / सह सचिव, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग	अध्यक्ष
२.	उद्योग संचालनालयाचे प्रतिनधी	निमंत्रित
३.	वित्तीय सल्लागार व सह सचिव , आव्यप्र	सदस्य
४.	अवर सचिव, आव्यप्र-१	सदस्य सचिव

या शिवाय आवश्यकता असल्यास सदर समितीस तांत्रिक तज्ञांना समितीच्या बैठकीस निमंत्रित करता येईल.

वाचा येथील शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या नियम पुस्तीकेत विहित केलेल्या खरेदी कार्यपध्दतीचा अवलंब करुन आपत्ती व्यवस्थापन प्रभागासाठी खरेदी तसेच घ्यावयाच्या सेवा या बाबींसदर्भात सर्व कार्यवाही वरील समितीने करावी आणि अंतिम निर्णयासाठी सक्षम प्राधिका-यास प्रस्ताव सादर करावा.

आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील तरतूदीनुसार आपत्ती व्यवस्थापनासाठी करावयाची खरेदी तसेच क्षमता बांधणी, जनजागृती, प्रशिक्षण इत्यादी बाबत घ्यावयाच्या सेवा याबाबतचे अधिकार वरील समितीस असतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५०३१५५२३७८६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावांने,

Shrirang Shripati Gholap

Digitally signed by Shrirang Shripati Gholap
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=DMU/R AND R, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e1b6e289fe7dcde27c972916398d8220a134ed8ebf6439e54d1927c5c4b28bec, cn=Shrirang Shripati Gholap
Date: 2018.05.03 15:54:24 +05'30'

(श्रीरंग घोलप)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) महालेखाकार (महाराष्ट्र -१), मुंबई
२) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
३) वित्तीय सल्लागार व सह सचिव, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई
४) लेखाधिकारी, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई
५) निवड नस्ती. (आव्यप्र-१)